महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : तिसरे | अंक : १४६ वे | दिनांक : २०/०५/२०२६ | वार : बुधवार

## अजित पवारांच्या मृत्यूशी अशोक खरातचा संबंध!: अंजली दमानियांचा दावा



**मुंबई :** अजित पवार यांच्या अपघाती मृत्यू प्रकरणात अशोक खरात याची सविस्तर चौकशी करण्यात यावी, अशी मागणी सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी केल्याने मोठी खळबळ उडाली आहे. या मृत्यूच्या अवघे 6 दिवस आधी अशोक खरातने तब्बल 4 मोबाईल फोन बदलल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. या संशयास्पद हालचालींमुळे अजित पवार यांच्या मृत्यूचा थेट संबंध खरातशी असल्याची दाट शक्यता अंजली दमानिया यांनी व्यक्त केली असून, या प्रकरणातील सत्य बाहेर आणण्यासाठी त्याची कसून चौकशी करण्याची आग्रही मागणी त्यांनी केली आहे.

अजित पवार यांच्या विमान अपघाताबाबत दिवसेंदिवस संभ्रम वाढत असून, हा केवळ अपघात होता की जाणीवपूर्वक केलेला घातपात, असे अनेक प्रश्न आता उपस्थित केले जात आहेत. यातच सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी सीडीआर आणि कृत्रिम बुद्धिमत्तेच्या मदतीने एक अत्यंत धक्कादायक खुलासा केला आहे. त्यांच्या दाव्यानुसार, संशयित अशोक खरातने आपला फोन सर्व्हिलन्सवर असल्याच्या भीतीने सतत हँडसेट बदलले असून, यापैकी एक हँडसेट तर केवळ 19 मिनिटांसाठी आणि एकाच फोन कॉलसाठी वापरून बदलण्यात आला होता. त्यामुळे या विमान अपघाताचे गूढ आणखीनच वाढले असून, या प्रकरणाच्या तपासाला आता एक नवे वळण मिळाले आहे.

अंजली दमानिया यांनी दिलेल्या माहितीनुसार, अशोक खरात याने 21 ते 31 जानेवारी या अवघ्या 10 दिवसांच्या कालावधीत तब्बल 5 वेळा आपले मोबाईल हँडसेट बदलल्याचे समोर आले आहे. यात सर्वात महत्त्वाची आणि धक्कादायक बाब म्हणजे, 27 ते 31 जानेवारी दरम्यान त्याने एक फोन वापरला आणि त्यानंतर तो पुन्हा कधीही वापरला नाही. तसेच अजित पवार यांच्या मृत्यूच्या काळात वापरलेले इतर चार फोनही त्याने नंतर पुन्हा कधीच वापरले नाहीत. आपला फोन तपास यंत्रणांच्या सर्व्हिलन्सवर (पाळतीवर) असल्याच्या भीतीनेच खरातने अशा प्रकारे सतत हँडसेट बदलले असावेत, असा गंभीर संशय अंजली दमानिया यांनी वर्तवला आहे.

अंजली दमानिया यांनी केलेल्या दाव्यानुसार, 31 जानेवारीला अशोक खरात नाशिकहून दिल्लीला गेला आणि त्याने विमानतळावरच आपला मोबाईल बदलल्याची अत्यंत महत्त्वाची माहिती समोर आली आहे. विशेष म्हणजे, 28 जानेवारीला म्हणजेच अजित पवार यांच्या मृत्यूच्या दिवशीच त्याने फोनचा सर्वाधिक वापर केल्याचेही उघड झाले आहे. या संशयास्पद हालचालींमुळे अजित पवार यांच्या मृत्यूशी खरातचा थेट संबंध असल्याची शक्यता अजिबात नाकारता येत नाही. त्यामुळे खरातने बदललेले ते चारही मोबाईल हँडसेट पोलिसांनी जप्त केले आहेत की नाही याची खातरजमा करून ते तातडीने फॉरेन्सिक लॅबकडे तपासासाठी पाठवावेत आणि पोलीस यंत्रणेने या संपूर्ण प्रकरणाची अत्यंत कसून चौकशी करावी, अशी आग्रही मागणी अंजली दमानिया यांनी केली आहे.

अजितदादांच्या अपघात प्रकरणात भोंदू खरातचे कनेक्शन समोर येत असून, 'त्या' सहा दिवसांत खरातने चार फोन बदलले, तर एक फोन केवळ 19 मिनिटांचा कॉल करून बदलला. खरातच्या फोनवर सर्वाधिक कॉल अजितदादांच्या अपघाताच्या दिवशी झाल्याची धक्कादायक माहिती समोर येत आहे. अजितदादांचे अपघात प्रकरण अतिशय भयानक असून, या प्रकरणात CID कडे माहिती देऊनही कारवाई होत नाही. त्यामुळे तात्काळ CBI कडे हा तपास देणे गरजेचे आहे. सीबीआयकडे तपास देण्यासंदर्भात सरकार त्वरित कार्यवाही करेल, ही अपेक्षा आहे. सरकारने आता जास्त उशीर करायला नको, अन्यथा हे संशयाचं धुकं अधिक गडद होईलच, शिवाय गुन्हेगार पुरावे सुद्धा दडपतील.

## मोबाईल नाही, कागदही नाही... मनोज मांडेंनी जोखावरच फोडला पेपर!



**पुणे :** नीट पेपरफुटी प्रकरणी सीबीआयच्या तपासातून एक अत्यंत धक्कादायक माहिती समोर आली आहे, ज्यामध्ये संशयित मनीषा मांढरे हिने बायॉलॉजीचा पेपर फोडताना कोणत्याही प्रत्यक्ष प्रश्नपत्रिकेचा किंवा मोबाईलचा वापर केला नसल्याचा खळबळजनक खुलासा झाला आहे. दरम्यान, या गुन्ह्याचे मूळ आणि तांत्रिक दुवे शोधण्यासाठी न्यायालयाने मनीषा मांढरेला 14 दिवसांची सीबीआय कोठडी सुनावली आहे.

नीट पेपरफुटी प्रकरणाच्या तपासात आता या संपूर्ण प्रकरणाचा मास्टरमाईंड शिवराज मोटेगावकर असल्याचे उघड झाले असून, त्यानेच पी.व्ही. कुलकर्णी आणि मनीषा मांढरे या दोघांची एनटीएच्या पॅनेलमध्ये वर्णी लावल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. मोटेगावकरने रचलेल्या या कटानुसार मनीषा मांढरेची बायॉलॉजी आणि कुलकर्णीची केमिस्ट्री या विषयांचे पेपर सेट करण्यासाठी निवड करण्यात आली होती, जेणेकरून हे दोघेही थेट मोटेगावकरपर्यंत पेपर पोहोचवू शकतील. अखेर, मोटेगावकर हा पेपर लीक करणाऱ्या एका मोठ्या आंतरराज्य टोळीचा सक्रिय सदस्य असल्याचा खुलासा झाला आहे.

संशयित आरोपी मनीषा मांढरे हिने पेपर फोडण्यासाठी कोणताही कागद किंवा मोबाईल न वापरता थेट आपल्या तल्लख स्मरणशक्तीचा वापर केल्याचा खुलासा झाला आहे. तिला परीक्षेचे सर्व प्रश्न तोंडपाठ असल्याने तिने मागे कोणताही तांत्रिक किंवा प्रत्यक्ष पुरावा सोडलेला नाही, ज्यामुळे सध्या सीबीआयसारखी मोठी तपास यंत्रणाही चक्रावून गेली आहे. प्रत्यक्षात या प्रकरणातील दुसरी आरोपी मनीषा वाघमारे हिने घेतलेल्या नावावरून मांढरेला ताब्यात घेण्यात आले असले, तरी कोणत्याही ठोस पुराव्याअभावी सीबीआयसमोर या गुन्ह्याची उकल करण्याचे आणि तिच्याविरोधात पुरावे गोळा करण्याचे एक मोठे आव्हान उभे राहिले आहे.

गेल्या 25 वर्षांपासून बायॉलॉजी विषय शिकवण्याचा प्रदीर्घ अनुभव असल्यामुळेच मनीषा मांढरेला परीक्षेचा कोणताही प्रश्न कुठेही लिहून ठेवण्याची गरज भासली नाही, तर तिने पेपर सेट केल्यानंतर ते सर्व प्रश्न थेट आपल्या डोक्यात ठेवून विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवल्याचे समोर आले आहे.

## मोटेगावकरने लातूरमधील क्लासेस मालकाची सुपारी देऊन केली हत्या, राष्ट्रवादीच्या नेत्याचा दावा

**बीड :** देशभरात गाजत असलेल्या 'नीट' पेपरफुटी प्रकरणाचे धागेदोरे नाशिक आणि पुण्यानंतर आता लातूरमध्ये अधिक घट्ट होताना दिसत आहेत. लातूरमधील प्रसिद्ध 'आरसीसी' (RCC) क्लासेसचे संचालक शिवराज मोटेगावकर यांना सीबीआयने आधीच अटक केली आहे. मात्र, आता या प्रकरणात एका जुन्या हत्या प्रकरणाची एन्ट्री झाल्याने खळबळ उडाली आहे. शिवराज मोटेगावकर यांनीच सुपारी देऊन लातूरमधील 'स्टेप बाय स्टेप' क्लासेसचे मालक अविनाश चव्हाण यांची हत्या घडवून आणली, असा खळबळजनक दावा राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) पक्षाने केला आहे.

राष्ट्रवादीचे प्रवक्ते शिवराज बांगर यांनी मोटेगावकर यांच्यावर गंभीर आरोप करत या प्रकरणाला वाचा फोडली आहे. बांगर यांच्या मते, अविनाश चव्हाण यांच्या हत्येनंतर दाखल झालेल्या पहिल्या एफआयआरमध्ये शिवराज मोटेगावकर हाच 'नंबर एक'चा आरोपी होता. तर गणेश चौगुले हा दुसऱ्या क्रमांकाच आरोपी होता. आर्थिक देवाणघेवाण आणि मोठ्या राजकीय प्रभावाचा वापर करून शिवराज मोटेगावकर यांनी या गुन्ह्यातून आपले नाव बाजूला काढून घेतले.

शिवराज बांगर यांनी मोटेगावकर यांचा उल्लेख 'खाजगी शिकवणी क्षेत्रातील माफिया' असा केला आहे. त्यांनी असा दावा केला की, मोटेगावकर यांनी केवळ 'नीट' किंवा 'सीईटी'चे पेपर फोडण्याचेच काम केले नाही, तर अनेक लहान-मोठ्या खाजगी क्लासेस चालकांना खोट्या गुन्ह्यात अडकवून उद्ध्वस्त केले आहे. त्यांच्या पाठीशी मोठे राजकीय पाठबळ असल्यामुळेच ते आतापर्यंत वाचत आले, असेही बांगर म्हणाले.

महाराष्ट्राच्या शिक्षण क्षेत्राला काळीमा फासणाऱ्या या प्रकरणाची सीबीआयने सखोल चौकशी करावी, अशी मागणी आता जोर धरत आहे. अविनाश चव्हाण हत्या प्रकरणाची फाइल पुन्हा उघडावी आणि त्या गुन्ह्याची नव्याने चौकशी करावी, अशी मागणी शिवराज बांगर यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे.

दरम्यान, नीट (NEET) पेपरफुटी प्रकरणी मुख्य संशयित शिवराज मोटेगावकर यांना अटक केल्यानंतर, आता सीबीआयने (CBI) त्यांच्या मुलालाही चौकशीसाठी ताब्यात घेतले आहे. मोटेगावकर यांच्या मुलाने यावर्षी बारावीची परीक्षा दिली असून, त्याला फुटलेल्या प्रश्नपत्रिकेचा थेट फायदा झाल्याचा संशय तपास यंत्रणांनी व्यक्त केला आहे. या पार्श्वभूमीवर, विविध आर्थिक व्यवहार आणि तांत्रिक दुव्यांची कसून पडताळणी केली जात आहे. सध्या शिवराज मोटेगावरच्या मुलाची पुण्यातील सीबीआय कार्यालयात चौकशी सुरू असल्याची माहिती मिळत आहे. मात्र, अधिकृत पातळीवर CBI कडून याबाबत कोणतेही निवेदन जारी करण्यात आलेले नाही. तसेच, तपास सुरू असल्याने चौकशीतील अनेक बाबी गोपनीय ठेवण्यात आल्या आहेत. दरम्यान, नीट पेपरफुटी प्रकरणाची व्याप्ती वाढताच नांदेडमधील अनेक नामांकित कोचिंग क्लासेसच्या संचालकांचे धाबे दणाणले आहेत. सत्र संपल्याचे कारण पुढे करत अनेक क्लासेसने आपली कार्यालये घाईघाईने बंद केली आहेत, तर काही संशयित संचालक शहरातून फरार झाले आहेत. दरम्यान, याच प्रकरणात पुण्यातून अटक झालेल्या मॉडर्न कॉलेजच्या जीवशास्त्र (Biology) विषयाच्या प्राध्यापिका मनीषा मांढरे यांच्यावर महाविद्यालय प्रशासनाने निलंबनाची कारवाई केली आहे. 2002 पासून कार्यरत असलेल्या मांढरे यांचे निलंबन 16 मेपासून लागू करण्यात आल्याचे परिपत्रक कॉलेजने काढले आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार २० मे २०२६


# पक्ष्यांचे शांततापूर्ण सहिष्णू जीवन आणि गांडूंची सहिष्णुता !

नुकताच आमच्यासोबत एका कॉलेजचा विद्यार्थी पक्षीनिरीक्षणाला आला होता. सकाळची वेळ होती आणि वातावरण एकदम प्रसन्न होते. मैना, सातभाई, चिमण्या, माळमुनिया आणि सुगरणींचे घोळके एकत्र येऊन दाणे-किडे आणि अळ्या टिपत होते. एका झाडावर कावळे गोळा झाले होते, तर दुसरीकडे दयाळ, होला, भारद्वाज, खाटिक, कोतवाल आणि वेडे राघू आपापल्या धुंदीत किडे पकडण्यात मग्न होते. झाडाच्या एका उंच शेंड्यावर तांबट पक्षी आपल्या नावाला साजेसा 'पुक-पुक/टुक-टुक' असा सूर लावून बसला होता, तर विजेच्या तारेवर खंड्या अगदी शांतपणे ध्यानस्थ होता.हे निरामय दृश्य त्या विद्यार्थ्याला दाखवत मी म्हणालो, "हे बघ दोस्ता, यालाच म्हणतात पक्ष्यांचे शांततापूर्ण सहअस्तित्व... म्हणजेच 'पीसफुल को-एक्झिस्टन्स' (Peaceful Co-existence)! निसर्गातले खरंखुरे सहिष्णू जीवन!"माझ्या या वाक्यावर तो विद्यार्थी ताडकन म्हणाला, "सर, मला या 'सहिष्णुता' शब्दाचा फार राग येतो! ही सहिष्णुता म्हणजे निव्वळ गांडूंची सहिष्णुता.सहिष्णुता म्हणजे दुबळेपणा आहे!"तो असे बोलतो न बोलतो, तोच विरुद्ध बाजूला पंख पसरवून बसलेली एक घार शिकारीसाठी झेपावली. ती फांदीवरून उठली मात्र, आणि एका क्षणात इतका वेळ शांत असलेल्या सर्व पक्ष्यांची वेगाने हालचाल सुरू झाली. संपूर्ण वातावरणात एकच कलकलाट झाला. याच सुमारास कावळे आणि कोतवाल या लढाऊ पक्ष्यांनी एकत्र येत त्या घारीचा हवेतच पाठलाग केला आणि तिला तिथून दूर पळवून लावले.ते विहंगम दृश्य पाहताच मी त्या विद्यार्थ्याला म्हणालो, "पाहिलीस ही सहिष्णुता? जोवर सर्व काही सुरळीत चालले होते, तोवर निसर्गात गुण्यागोविंदाचे वातावरण होते. मात्र, जशी घार शिकारीसाठी उडली, तसा सर्वांनी एकत्र येत प्रतिकार केला. कावळे आणि कोतवालांसारख्या आक्रमक पक्ष्यांनी घारीला पळवून लावले आणि इतरांचे प्राण वाचवले. दोस्ता, सहिष्णुता ही काही दुर्बलांची किंवा लाचारांची नसते, हे आता तरी तुझ्या लक्षात आले की नाही? आज या पक्षीजगाने सहिष्णुतेचा खरा अर्थ प्रामुख्याने दाखवून दिला आहे!"निसर्गाचा नियमच आहे की, जोपर्यंत सर्वजण आपापल्या मर्यादेत राहून निसर्गाचा आनंद घेत आहेत, तोपर्यंत पूर्ण सहिष्णुता असते. पण जेव्हा या सहअस्तित्वावर, स्वातंत्र्यावर किंवा अस्तित्वावरच संकट येते, तेव्हा 'मूक' राहणे हा विवेक नव्हे, तर तो मृत्यू ठरतो. तिथे एकत्रितपणे प्रतिकार करणे हाच निसर्गाचा खरा नियम आहे.मी पुढे त्याला समजावून सांगितले, "सहिष्णुता म्हणजे विवेक आणि तारतम्य! दुसऱ्यासोबत सहजीवन जगणे म्हणजे शरणागती पत्करणे नव्हे. सहजीवन म्हणजे लाचारीने केलेली तडजोड (Compromise) नसून, एकमेकांना समजून घेत केलेले संवादात्मक समायोजन (Adjustment) असते. प्रत्येकाचे आचार-विचार, खानपान, रंग आणि आकार वेगवेगळे असलेले हे पक्षी जसे एकत्र शांततेने राहतात; तसेच मानवी समाजानेही प्रगल्भतेने सहिष्णू जीवन जगणे गरजेचे आहे.""तू तर MSW (Master of Social Work) चा विद्यार्थी आहेस, त्यामुळे तू सहिष्णुता म्हणजे काय हे आधी सैद्धांतिक पातळीवर नीट समजावून घेतले पाहिजेस. तुझ्या मनात जो गैरसमज निर्माण झाला आहे, तो दूर करण्यासाठी तू या संकल्पनेचा सखोल अभ्यास करावा, असा माझा तुला आग्रह आहे. आजच्या नव्या पिढीला 'गुगल' (Google) करण्याची सोय आहे, तिथे जाऊन जरा याबद्दल अचूक माहिती शोध."सहिष्णुता या संकल्पनेचा प्राथमिक पाया प्रख्यात विचारवंत जॉन लॉक यांनी १६८९ मध्ये लिहिलेल्या 'अ लेटर कन्सर्निंग टॉलरेशन' (A Letter Concerning Toleration) या ग्रंथात विस्ताराने मांडला. त्यांनी धार्मिक संदर्भात व्यक्तीच्या वैचारिक स्वातंत्र्याचा पुरस्कार केला. पण जेव्हा तू याचा सखोल अभ्यास करशील, तेव्हा तुझ्या लक्षात येईल की, 'विवेकपूर्ण सहिष्णुता' या संकल्पनेचा पाया केवळ एका व्यक्तीपुरता मर्यादित नाही. हा विचार पुढे शतकानुशतके वेगवेगळ्या उदारमतवादी, विवेकवादी आणि मानवतावादी विचारवंतांच्या सखोल मंथनातून आकाराला आला आहे. या वैचारिक मंथनात व्हॉल्टेअर (Voltaire), जॉन स्टुअर्ट मिल (John Stuart Mill) आणि मायकेल वॉल्झर (Michael Walzer) या विचारवंतांचे योगदान मोलाचे आहे.फ्रेंच तत्त्ववेत्ता व्हॉल्टेअर याने आपल्या 'ट्रीटाइज ऑन टॉलरेशन' (Treatise on Tolerance - 1763) या ग्रंथाद्वारे सहिष्णुतेला सामाजिक चळवळीचे रूप दिले आणि विवेक व सहिष्णुता या एकाच नाण्याच्या दोन बाजू कशा आहेत, हे दाखवून दिले. तर ज्याला आपण आज 'Thoughtful' किंवा विचारपूर्वक सहिष्णुता म्हणतो, त्याचे सर्वात स्पष्ट प्रतिबिंब मिल यांच्या 'ऑन लिबर्टी' (On Liberty - 1859) या ग्रंथात आढळते. विरोधी मते दडपण्याऐवजी ती ऐकून घेतल्यानेच सत्याचा शोध घेता येतो, हा विचार त्यांनी रुजवला. आधुनिक काळातील राजकीय तत्त्वज्ञ मायकेल वॉल्झर यांनी त्यांच्या 'ऑन टॉलरेशन' (On Toleration - 1997) या पुस्तकात सहिष्णुतेच्या विविध पातळ्या स्पष्ट केल्या आहेत. केवळ सहन करण्याच्या प्राथमिक टप्प्यापासून ते थेट समोरील व्यक्तीच्या संस्कृतीचा आदरपूर्वक स्वीकार करणे, हाच 'Thoughtful Tolerance' चा खरा प्रवास असल्याचे त्यांनी मांडले.या सर्वांच्या सखोल विश्लेषणातून 'विवेकपूर्ण सहिष्णुता' म्हणजे काय ? हे खालील चार महत्त्वाच्या मुद्द्यांच्या आधारे स्पष्ट होते.१.सहिष्णुता म्हणजे भित्रेपणा,लाचारी नव्हे. डोळे मिटून सगळं अन्यायकारक सहन करणे आणि "मी तर खूप सहनशील आहे" असं म्हणून गप्प बसणं म्हणजे सहिष्णुता अजिबात नाही. समाजात चुकीचे, अन्यायकारक, विवेकहीन किंवा अमानवी घडत असताना मूक संमती देणे ही केवळ 'भीरुता' (भित्रेपणा) ठरेल. खरी सहिष्णुता अन्यायासमोर नतमस्तक व्हायला शिकवत नाही, तर व्यक्तीला विवेकाचा आवाज उठवण्याचे धाडस देते.२.सहिष्णुता म्हणजे विरोधी मतांचा आदर. विवेकपूर्ण सहिष्णू व्यक्ती समोरच्याचे ऐकून घेताना आपल्या बुद्धीचा पूर्ण वापर करते. समोरची व्यक्ती आपल्यापेक्षा वेगळे मत मांडत असेल, तर लगेच आक्रमक न होता, "समोरील व्यक्ती असे का बोलत आहे?" त्यामागची पार्श्वभूमी समजून घेण्याचा प्रामाणिक प्रयत्न करते. पूर्वग्रह आणि अंधश्रद्धा बाजूला ठेवून विचार करणे हाच या सहिष्णुतेचा गाभा आहे.३.सहिष्णुतेत सहन करण्यापेक्षा 'समजून घेणे' महत्त्वाचे असते. सहिष्णुतेचा अर्थ फक्त 'सक्तीने सहन करणं' असा घेतला, तर त्यात लाचारी येते. परंतु, खऱ्या सहिष्णुतेत आदरपूर्वक संवाद महत्त्वाचा असतो. सुसंवादामुळेच दोन भिन्न टोकांच्या विचारांमध्ये सामंजस्याचा पूल बांधला जाऊ शकतो.४.सहिष्णुता म्हणजे वैचारिक स्वातंत्र्याचा स्वीकार. सहिष्णुता म्हणजे समोरच्याचे मत आपल्याला 'मान्य असलेच पाहिजे' असे नाही. आपल्याला समोरचे मत पूर्णपणे अमान्य असू शकते, तरीही त्याला ते मत मांडण्याचा लोकशाही अधिकार आहे हे स्वीकारणे म्हणजेच सहिष्णुता.माझ्या मित्रा थोडक्यात सांगायचे तर जॉन लॉक यांच्या विचारांपासून सुरू झालेला आणि अनेक उदारमतवादी विचारवंतांच्या चर्चेतून तावून-सुलाखून निघालेला हा विचार आज एका व्यापक मानवी मूल्यामध्ये रूपांतरित झाला आहे. 'विवेकपूर्ण सहिष्णुता' ही समाजाला जोडणारे अमूल्य माध्यम आहे. ही संकल्पना आपल्याला केवळ शांत बसायला शिकवत नाही, तर बुद्धी आणि विवेकाच्या प्रकाशात जगातील विविधतेचा आदर करण्यास शिकवते आणि अन्यायाविरुद्ध जागरूक राहण्याची वृत्ती देते. आजच्या अशांत काळात वैज्ञानिक दृष्टिकोन (Scientific Temperament), लोकशाही आणि सामाजिक सलोखा टिकवण्यासाठी या मूल्याची नितांत गरज आहे.

**पक्षीमित्र राजेंद्र गाडगीळ**

# 'इकरा पब्लिक हायस्कूल' जळगावच्या विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्ती परीक्षेत दैदीप्यमान यश





**जळगाव :** महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे तर्फे आयोजित करण्यात आलेल्या 'पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा (PSS) इयत्ता ८ वी' चा निकाल नुकताच घोषित झाला असून, यामध्ये स्थानिक इकरा पब्लिक हायस्कूल व ज्युनियर कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी आपल्या उत्कृष्ट बुद्धिमत्तेच्या जोरावर घवघवीत यश संपादन केले आहे. दरवर्षीप्रमाणे यावर्षीही शाळेच्या विद्यार्थ्यांनी आपल्या यशाची दैदीप्यमान परंपरा कायम राखली असून,अनस अय्युब चौधरी आणि इरम फातेमा शेख फारुक या दोन गुणवंत विद्यार्थ्यांनी या अत्यंत प्रतिष्ठेच्या परीक्षेत उत्तीर्ण होऊन शाळेचे नाव सुवर्णाक्षरांनी उज्ज्वल केले आहे. इकरा पब्लिक हायस्कूलमध्ये विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण प्रगतीसाठी आणि त्यांच्यातील स्पर्धात्मक व वैज्ञानिक दृष्टिकोन वाढीस लावण्यासाठी विशेष स्पर्धा परीक्षा वर्गांचे आयोजन केले जाते. यामध्ये 'मिशन यूपीएससी', 'डॉ. होमी भाभा बालवैज्ञानिक परीक्षा', 'NMMS' आणि 'ज्युनिअर सायंटिस्ट' यांसारख्या विविध नामांकित परीक्षांचे विशेष क्लासेस अत्यंत कौशल्याने घेतले जातात; ज्याच्या फलश्रुतीमुळे आजवर शाळेतील असंख्य विद्यार्थ्यांना लाखो रुपयांची शिष्यवृत्ती प्राप्त झाली आहे. या विद्यार्थ्यांच्या नेत्रदीपक यशामुळे संपूर्ण परिसरात आनंदाचे वातावरण पसरले असून, त्यांच्यावर सर्व स्तरांतून कौतुकाचा वर्षाव होत आहे. विद्यार्थ्यांच्या या अभूतपूर्व यशाबद्दल इकरा शैक्षणिक संस्थेचे चेअरमन डॉ.अ.करीम सालार, एजाज मलिक, शाळेचे प्राचार्य शेख शकील व सर्व शिक्षक वृंद यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे तसेच त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहणाऱ्या मार्गदर्शक शिक्षकांचे व पालकांचे मन:पूर्वक कौतुक केले असून, या सर्व चमकत्या ताऱ्यांना त्यांच्या पुढील शैक्षणिक वाटचालीस आणि उज्ज्वल भविष्यासाठी भरभरून शुभेच्छा दिल्या


१० वी, १२ वी पास (कोणतीही शाखा)
विद्यार्थ्यांसाठी सुवर्ण संधी

D.M.L.T
Diploma In Medical Laboratory Technology

- महाराष्ट्र पॅरामेडीकल कॉन्सीलमध्ये नोंदणी करता येते.
- सरकारी / निमसरकारी हॉस्पीटलमध्ये लॅब असिस्टंट होण्याची संधी.
- शासकीय नोकरीसाठी मान्यता प्राप्त.
- हा कोर्स झाल्यानंतर डायरेक्ट BSC ला ॲडमीशन भेटेल ११ वी, १२ वी सायन्स करण्याची गरज नाही.

डॉ.दत्ताभाऊ पाथ्रीकर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित
मातोश्री डॉ.कंचन शांतीलालजी देसरडा पॅरामेडिकल कॉलेज.
बीबीका मकबऱ्याच्या मागे, हनुमान टेकडीजवळ, पहाडसिंगपुरा, छ.संभाजीनगर (औरंगाबाद.)
9405109103
8830838903

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार २० मे २०२६


# ३ सख्ख्या भावंडांचा पाण्यात बुडून मृत्यू

**अमरावती :** जिल्ह्यातील पुसली धरणात ३ चिमुकल्या भावंडांचा बुडून मृत्यू झाल्याची हृदयद्रावक घटना घडली आहे. हे तिघेही रविवारपासून बेपत्ता झाले होते. त्यांचे मृतदेह सोमवारी दुपारी धरणाच्या पाण्यात तरंगताना आढळले. एकाच घरातील ३ हसतीखेळती मुले एकाचवेळी काळाच्या पडद्याआड केल्यामुळे संपूर्ण जिल्ह्यावर शोककळा पसरली आहे.

यासंबंधीची माहितीनुसार, पंकज संतुलाल उईके (१०), प्रिया संतुलाल उईके (८) व पवन संतुलाल उईके (७) अशी मृत्यू झालेल्या तिन्ही भावंडांची नावे आहेत. ही तिन्ही मुले नरखेड येथील एका आश्रमशाळेत शिकत होती. ते सध्या सुट्ट्या असल्यामुळे आपल्या आई-वडिलांकडे आले होते. हे तिघेही रविवारी दुपारी घरातून बाहेर पडले होते. त्यानंतर सायंकाळी झाली ते घरी परतले नाही. त्यामुळे चिंताग्रस्त झालेल्या त्यांच्या आई-वडिलांनी गावकऱ्यांच्या मदतीने त्यांचा शोध सुरू केला. त्यांचा शोध रात्रभर सुरू होता. सोमवारी सकाळपासून त्यांचा शेतशिवारासह पुसली धरण परिसरात शोध घेण्यात आला. त्यात दुपारी २ च्या सुमारास तिन्ही भावंडांचे कपडे धरणाच्या काठावर आढळून आले.

त्याची खबर तात्काळ स्थानिक पोलिसांना देण्यात आली. त्यानंतर त्यांचा धरणात शोध घेतला असता तिन्ही भावंडांचे मृतदेह धरणाच्या पाण्यात तरंगताना आढळले. ही मुले धरणात अंघोळीसाठी गेली असावीत आणि पाण्याचा अंदाज न आल्यामुळे एकाला वाचवण्याच्या नादात तिघेही बुडाले असावेत, असा अंदाज या प्रकरणी व्यक्त केला जात आहे. पोलिस अधिकारी दीपक महाडिक यांनी ग्रामस्थांच्या मदतीने त्यांचे मृतदेह बाहेर काढून पंचनामा केला.

संतुलाल उईके हे मूळचे मध्य प्रदेशातील छिंदवाडा जिल्ह्यातील घाना बिंद्रा येथील आहेत. ते रोजगारासाठी शेंदूरजनाघाट येथील मनोहर निमकर यांच्या शेतात सातनूर येथे झोपडी करून वास्तव्यास होते. स्वतःच्या पोटाची खळगी भरण्यासाठी गाव सोडून आलेल्या या कुटुंबावर नियतीने अत्यंत क्रूर घाला घातला. संतुलाल यांनी आपल्या तिन्ही मुलांना पोहता येत नसल्याचे सांगितले.

दरम्यान, ज्या वयात या चिमुकल्यांनी खेळायचे बागडायचे अगदी त्याच वयात या तिघांचेही मृतदेह पाहण्याची वेळ त्यांच्या संतुलाल व त्यांच्या पत्नीवर आली. त्यामुळे त्यांचा हंबरडा पाहून घटनास्थळी उपस्थित सर्वांचेच डोळे पाणावले. एकाच कुटुंबातील ३ मुलांचा मृत्यू झाल्यामुळे संपूर्ण जिल्ह्यावर शोककळा पसरली आहे. या प्रकरणी पोलिस पुढील तपास करत आहेत.

# संभाजीनगरच्या विद्यापीठातील पीएच.डी. घोटाळा, संशोधन अनुदान आणि भेदभावाचा मुद्दा पुन्हा ऐरणीवर



**छत्रपती संभाजीनगर :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ प्रशासनाने विद्यार्थी-केंद्रित व न्याय्य धोरण स्वीकारून शैक्षणिक, संशोधन व प्राध्यापक हिताच्या प्रलंबित प्रश्नांचे त्वरित निराकरण करावे, या मागणीसाठी 'बामुक्टो' (डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ आणि महाविद्यालयीन प्राध्यापक संघटना) आक्रमक झाली आहे. संघटनेच्या वतीने मा. कुलगुरूंना विविध न्याय्य मागण्यांचे निवेदन सादर करण्यात आले असून, मागण्या तातडीने मंजूर न झाल्यास तीव्र आंदोलनाचा इशारा देण्यात आला आहे. विद्यापीठातील पीएच.डी. घोटाळा, संशोधन अनुदान आणि भेदभावाचा मुद्दा 'बामुक्टो'ने ऐरणीवर आणला आहे.

विद्यार्थ्यांच्या हिताकडे लक्ष वेधताना बामुक्टोने पीएच.डी. संदर्भातील अनेक गंभीर मुद्दे उपस्थित केले आहेत. यामध्ये प्रामुख्याने:

•पीएच.डी. संदर्भातील भरती प्रक्रिया ही बिंदूनामावलीनुसारच (Roaster) करण्यात यावी.

•न्यायालयाने पीएच.डी. संदर्भात दिलेले निर्णय विद्यापीठाने तत्काळ लागू करून विद्यार्थ्यांना न्याय द्यावा.

•सर्वात महत्त्वाचे म्हणजे, पीएच.डी. संदर्भात विद्यापीठाने नियुक्त केलेल्या समितीचा अहवाल गुलदस्त्यात न ठेवता तो विद्यार्थ्यांसाठी खुला करण्यात यावा. या अहवालावर आक्षेप नोंदवण्यासाठी विद्यार्थ्यांना किमान १० दिवसांचा कालावधी देऊन त्या आक्षेपांचे तातडीने निराकरण करावे, अशी मागणी करण्यात आली आहे.

विद्यापीठ कॅम्पस मधील प्राध्यापक आणि उप-केंद्रे किंवा संलग्न महाविद्यालयांतील प्राध्यापक यांच्यात विद्यापीठ प्रशासन दुजाभाव करत असल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे.

महाविद्यालयीन प्राध्यापकांना यापूर्वी देण्यात आलेली पीएच.डी. संशोधक मार्गदर्शक मान्यता कायम ठेवण्यात यावी. कॅम्पसवरील प्राध्यापकांप्रमाणेच महाविद्यालयीन प्राध्यापकांनाही संशोधक विद्यार्थी देण्यात यावेत, जेणेकरून हा भेदभाव संपेल, असा दावा निवेदनात केला आहे.

विद्यापीठ निधीतून कॅम्पसवरील प्राध्यापकांना ज्या धर्तीवर संशोधन अनुदान दिले जाते, त्याच धर्तीवर महाविद्यालयीन प्राध्यापकांनाही किमान १,००,०००/- रुपये संशोधन अनुदान देण्यात यावे, अशी मागणीही करण्यात आली आहे.

विद्यापीठाच्या विविध समित्यांवर नियुक्त्या करताना महाविद्यालयीन प्राध्यापकांना जाणीवपूर्वक डावलले जात असून, हा भेद मिटवण्यासाठी प्रशासनाने सकारात्मक पावले उचलावीत, असे आवाहन करण्यात आले आहे.

अधिसभेमध्ये (सिनेट) सर्वसंमतीने पारित झालेले प्राध्यापक हिताचे ठराव कोणत्या अधिकाराखाली रद्द करण्यात आले, याचे स्पष्टीकरण विद्यापीठ प्रशासनाने द्यावे, अशी मागणी करत जाणीवपूर्वक प्राध्यापकांचा आवाज दाबण्याचा प्रयत्न थांबवण्याचा इशारा निवेदनात देण्यात आला आहे. तसेच, विद्यापीठ कायद्यानुसार महाराष्ट्र शासनाने तयार केलेल्या परिनियमांच्या (Statutes) अंमलबजावणीची सद्यस्थिती विद्यापीठाने जाहीर करावी, असेही म्हटले आहे.

शैक्षणिक सत्रांचे विस्कळीत झालेले वेळापत्रक रुळावर आणण्यासाठी सर्व शैक्षणिक सत्रे व परीक्षा एप्रिल महिन्यातच पूर्ण होतील, असे सुयोग्य नियोजन करावे. मात्र, हे नियोजन करताना प्राध्यापकांच्या हक्काच्या सुट्ट्यांवर परिणाम होणार नाही, याची दक्षता प्रशासनाने घ्यावी. याचबरोबर, उत्तरपत्रिका मूल्यांकन करणाऱ्या प्राध्यापकांच्या मानधनात तातडीने वाढ करण्यात यावी, अशीही मागणी करण्यात आली आहे.

"विद्यापीठ प्रशासनाने या सर्व मागण्यांवर साकल्याने व सकारात्मक विचार करून तातडीने अंमलबजावणी करावी, अन्यथा विद्यार्थी, शिक्षण आणि प्राध्यापक हितासाठी बामुक्टोला रस्त्यावर उतरून तीव्र आंदोलनात्मक भूमिका घ्यावी लागेल," असा थेट इशारा संघटनेने दिला आहे.

या निवेदनावर बामुक्टोचे अध्यक्ष डॉ. बप्पासाहेब म्हस्के, सचिव डॉ. मारोती तेगमपुरे, उपाध्यक्ष डॉ. शफी शेख, अधिसभा सदस्य डॉ. उमाकांत राठोड आणि बीड जिल्हा अध्यक्ष डॉ. रामहरी मायकर यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.






# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार २० मे २०२६


## सर्जक, परिपक्व व मूल्यगर्भ कविता

अलीकडचे काही कवितासंग्रह पाहता, मराठी कविता, वर्षानुवर्षांची जुनी असणारी ‘वैचारिक- भावनिक’ कोंडी फोडत आहे, असे दिसते. सुधीर देवरे यांची कविता नक्कीच या प्रक्रियेला बळ देणारी आहे. ‘उपयुक्तता’ (सामाजिक, राजकीय वा व्यक्तिगत) हे साध्य ओलांडून कविता आता ‘मानवी’ होण्याचे धाडस करू लागलेली आहे. ‘मानवी’ म्हणजे काय तर विशिष्ट व्यक्ती वा समूह यांच्यापुरत्या मर्यादित नसणाऱ्या कविता. सर्वच मानवांना व्यापणाऱ्या, समावेशक कविता. सार्वत्रिक समावेशक समस्या, प्रश्न यांना सामोऱ्या जाणाऱ्या, भिडणाऱ्या कविता. देवरे यांच्या या कविता त्यामुळे व्यापक आशयाच्या झालेल्या आहेत. अनुभवाची स्थितिशीलता सोडून प्रवाही प्रक्रियांच्या कविता झालेल्या आहेत. स्थितिशील बौध्दीक साच्यांना इथे महत्व नाही. मराठीत अजूनही जोमात आणि रूढ असणाऱ्या स्वच्छंदी (रोमँटिक) मार्गाने ही कविता जात नाही. स्वप्नीलपणा, भावनिकता, अलंकरण, पुन:प्रत्ययही इथे नाही. ही अधिक सर्जक व परिपक्व कविता आहे. नुसत्या प्रतिक्रिया न देता, जगणे, ‘जे जसे आहे तसे’ पाहण्याची हिंमत या कविता करतात, किंबहुना तेच या कवितांचे अस्तित्वकारण व कल्पनाविश्व आहे. मराठीतल्या साहित्यिक वातावरणाची वा अपेक्षांची पर्वा न करता देवरे कविता लिहितात, असे म्हणता येईल. या कवितांच्या अभिव्यक्तीची भाषा केवळ निसर्ग- घटितांतील प्रतिमांना प्राधान्य देणारी नसून एकूणच सृष्टीतील जगण्याला खुला वाव देणारी आहे. या व अशा कारणांमुळे, मराठीत या कवितांना वेगळी मूल्यात्मकता राहील, असे मला वाटते. - चं. प्र. देशपांडे

*‘पाय नसलेली माणसं’ कवितासंग्रहाची पाठराखण अर्थात ब्लर्ब :

सृष्टी ज्या वैश्विक पायांवर तगून उभी आहे, अशा पायांवर अर्थगर्भ भाष्य म्हणजे समृध्द कल्पनाविश्वातली ही समग्र कलात्मक कविता! सुधीर राजाराम देवरे यांच्या ‘पाय नसलेली माणसं’ या संग्रहातील बहुतांश कवितांमध्ये ‘पाय’ ही बहुअर्थी प्रतिमा, कुठं प्रतीक, तर कुठं रूपक होऊन येते. (कुठं जसाच्या तसा वास्तव मानवी-जैवीक अवयवही). आपल्यातल्या विविध व वेगळ्या परिप्रेक्षातल्या भौतिकी आणि अतिभौतिकी, अधू आणि तंदुरूस्त पायांवर ह्या कवितांत आदिम वेदनेचं मूल्यगर्भ चिंतन असून मुक्त काव्य, छंद, गूढ, अभंग, आशयघन, कलात्मकतेपासून ते अतिशय सहज सोप्या सरळ बोलीतल्या ओघवत्या शैलीतील चिंतनात्मक रचनेपर्यंतच्या संवेदनशील कविता ह्या संग्रहात वाचायला मिळतात. पाय नसूनही उंच भराऱ्या घेणारे लोक आणि सृष्टीतल्या अनेकार्थी पायांचं चित्रण ह्या प्रायोगिक नवकवितेत सतत होत राहतं. - लोकनाथ यशवंत

**- चं. प्र. देशपांडे**

‘पाय नसलेली माणसं’ — शब्दालय प्रकाशन
मोबा. 9822525444

## गरीबच होरपळू लागले

शिक्षणाच्या बाजारात,
गरीबच होरपळू लागले.
पेपर फोडून क्लासवाले,
खिसे मात्र भरू लागले. १

गरिबांच्या गुणवत्तेची,
राख रांगोळी करू लागले.
स्वत:च्या स्वार्थापोटी,
किती निर्दयीपणे वागले. २

प्रसिद्धीच्या नादी लागून,
गुणवत्तेचा अंत करू लागले.
महागडी फी घेऊन सुद्धा,
पेपर फोडून विकू लागले. ३

असा कसा स्वार्थ तुमचा,
भर दिवसा स्वप्न विकू लागले.
हरामखोरांनो लाज राखा,
गरीब उध्वस्त होऊ लागले. ४

पैसे घेऊन गुणवत्तेची अशी,
भर दिवसा थट्टा करू लागले.
आदर्श अशा पेशात येऊन,
भर दिवसा भीक मागू लागले.



**नागेश बोंतेवाड,**
**छत्रपती संभाजीनगर**

## वर्तमानपत्रा

वर्तमानपत्रा रे वर्तमानपत्रा
तू केव्हा येतोस घरी
तुझी वाट पाहत
उभा असतो दारी

तू घरी आल्यावर
तुला चाळतात बाबा
कितीही वाचला तरी
स्वत:वर नसतो ताबा

नोकरीची जाहिरात
बारकाईने पाहतो दादा
पाककृती वाचून आई
पदार्थ बनविते सदा

राशीभविष्य पाहण्यासाठी
आजी चष्मा लावते जेव्हा
गंमतीने आजोबा म्हणतात
धनलाभ होणार केव्हा?

तुला वाचण्याची ताईलाही
लागली अती गोडी
रिकामा वेळ पाहून
सोडवित बसते कोडी

घरातील प्रत्येक जण
चाहते आहेत तुझे
बालकथा, कविता वाचून
तृप्त होते मन माझे



**- रवींद्र चालीकवार**
मु.पो.ता.महागाव
जि.यवतमाळ
मो.९०११५५९१०६

## NEET सारखाच घोटाळा MH-CET परीक्षेतही - सचिन सावंत



**मुंबई :** नीट सारखाचा गडबड घोटाळा MH – CET परिक्षेतही झाल्याचा सनसनाटी आरोप काँग्रेसचे नेते सचिन सावंत यांनी केला आहे. नीट परीक्षेच्या पेपर लिक प्रकरणात महाराष्ट्रासह देशभरात सीबीआयकडून कारवाई केली जात आहे. या पार्श्वभूमीवर सचिन सावंत यांनी पत्रकार परिषद घेत आणखी एक गंभीर गौप्यस्फोट केला आहे.

सचिन सावंत म्हणाले, देशभरात नीट पेपरफुटीने विद्यार्थी आणि पालकांची चिंता वाढली आहे. आयुष्याचा महत्त्वाच्या टप्प्यावर जर तरुण पिढीला फसवले जात असेल तर ही देशाची सुद्धा फसवणूक आहे. नीट पेपरफुटीची चौकशी सुरू असली तरी अशा प्रकारच्या चौकशीतून पुढे काहीही निष्पन्न होत नाही, हा आजवरचा अनुभव आहे. तसेच नीट सारखाच गडबड घोटाळा MH-CET परीक्षेतही झाला आहे. दहावी बारावीला जेमतेम ३५-४० टक्के पडलेल्या विद्यार्थ्यांना MH-CET परीक्षेत १०० पर्सेंटाइल पडलेले आहेत, हा घोटाळा असून त्याची उच्चस्तरीय चौकशी करून दोषींना कठोर शिक्षा करा, अशी मागणी सावंत यांनी केली आहे.

पुढे बोलताना सचिन सावंत म्हणाले, MH-CET परीक्षेचा अभ्यासक्रम हा ११-१२ वीचा असतो, १० वी १२ परीक्षेत जेमतेम मार्क्स मिळवलेल्या २२ विद्यार्थ्यांना MH-CET परीक्षेत मात्र १०० पर्सेंटाइल मिळालेले आहेत. ज्या विद्यार्थ्याला १० वीच्या परीक्षेत ३७ टक्के मार्क्स मिळाले त्याला MH-CET मध्ये ९९.९७१ टक्के पर्सेंटाईल मिळाले आहेत. बारावीत ज्यांना ५१ टक्के मार्क्स मिळाले अशा दोन विद्यार्थ्यांना MH-CET मध्ये १०० पर्सेंटाईल, ४५ टक्के मार्क्स पडलेल्याला १०० पर्सेंटाइल आणि ३९ टक्के मार्क्स पडलेल्या विद्यार्थ्याला १०० पर्सेंटाईल पडलेले आहेत. बारावीला ज्या विद्यार्थ्याला ३५ मार्क्स पडले त्यालाही १०० पर्सेंटाईल पडले आहेत.

MHT-CET गणितात १०० पर्सेंटाइल मिळवलेल्या रँक १, २, ३, ४, ५, ६, १५, १६, १७ आणि १८ या सर्व विद्यार्थ्यांचे HSC गणितातील सरासरी गुण फक्त ६४.३% होते. या राज्यातील दहा अव्वल विद्यार्थ्यांपैकी सहा जणांचे गुण या सरासरीपेक्षाही कमी होते, त्यांचे HSC गणितातील गुण अनुक्रमे ६०, ५४, ५३, ५३, ४० आणि ३५ होते. CET मधील टॉप २० रँकर्सपैकी ६ विद्यार्थ्यांना बोर्ड परीक्षेत ६०% पेक्षाही कमी गुण मिळाले. रँक १, २, ५, १२, १५ आणि १८ - ज्यांचे CET पर्सेंटाइल ९९.९९ किंवा त्यापेक्षा जास्त आहे - यांना HSC PCM मध्ये ६०% पेक्षा कमी गुण मिळाले. MH – CET परिक्षेवर नियंत्रण कोणाचे, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकात पाटील यांनी उत्तर द्यावे? अशी मागणी सावंत यांनी केली आहे. तसेच तसेच या परिक्षा कोण नियंत्रित करतो, या परिक्षांवर जोशी नामक व्यक्तीचा काय संबंध आहे, याचाही खुलासा केला पाहिजे, असेही त्यांनी म्हटले आहे.दरम्यान, CET गणितात १०० पर्सेंटाइल मिळवून राज्यातील टॉप २० मध्ये स्थान मिळवणाऱ्या एका गुणवंत विद्यार्थ्याला बारावी बोर्डाच्या पीसीएम (PCM) ग्रुपमध्ये अवघे ३९ टक्के गुण मिळाल्याचे उघड झाले आहे. इतकेच नव्हे, तर सीईटी गणितात परफेक्ट १०० पर्सेंटाइल मिळवणाऱ्या टॉप २० मधील तब्बल १० विद्यार्थ्यांच्या बारावी गणितातील गुणांमध्ये ३५ ते ९७ अशी तब्बल ६२ गुणांची प्रचंड तफावत पाहायला मिळत आहे. यामध्ये एका विद्यार्थ्याला सीईटी गणितात पूर्ण १०० पर्सेंटाइल असूनही बारावी गणितात केवळ ३५ टक्के गुण मिळाल्याने दोन्ही परीक्षांच्या गुणांमधील हे ६५ गुणांचे मोठे अंतर सध्या शिक्षण क्षेत्रात आश्चर्य आणि तीव्र चर्चेचा विषय ठरत आहे.

सचिन सावंत पुढे म्हणाले, पंतप्रधान नरेंद्र मोदी 'परिक्षा पे चर्चा'मध्ये दरवर्षी मोठे प्रवचन देत असतात पण त्यांच्याच कार्यकाळात 'व्यापम' सारखे परिक्षा घोटाळे फोफावत आहेत ही चिंतेची बाब आहे. भारतीय जनता पक्षाचे सरकार असलेल्या राज्यातच परिक्षेत गडबड घोटाळे वाढले आहेत. त्या घोटाळ्यातील लोकांचे संबध भाजपा नेत्यांशी असलेल्याचे उघड झाले आहेत. MH-CET च्या परिक्षेतील घोटाळ्यावर मी एक्स या सोशल मीडियावरून एक पोस्ट केली होती, त्यावर या परिक्षा घेणाऱ्या सेलकडून यादी अस्पष्ट आहे असा खुलासा करण्यात आला आहे. या यादीतील विद्यार्थ्यांची नावे सार्वजनिक होऊ नयेत म्हणून ती झाकण्यात आली होती.

आता मी पुन्हा एमएच सीईटी कमिशनला एक यादी आणि पत्र देणार आहे, त्यावर त्यांनी खुलासा करावा. एमएचसीईटी परिक्षा सेलमध्ये मागील ८-१० वर्षे तेच अधिकारी काम करत असून त्यांच्या बदल्याही झालेल्या नाहीत. नीट, एमएच-सीईट सारख्या परिक्षा विद्यार्थ्यांच्या भवितव्य ठरवणाऱ्या असतात त्यात अशा प्रकारे घोटाळे करून लाखो विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी खेळू नका, असे सचिन सावंत यांनी म्हटले आहे.


ADMISSION OPEN
10th, 12th and Graduate Students
Government Recognised
Job Guarantee Courses
DMLT
P.G.DMLT
X-RAY
C.T.-SCAN
E.C.G.
Radiology
Physiotherapy
Optometry
O. T. TECHNICIAN
PG Radiology
Contact: 9405109103
8830838903